अधिव्याख्याता, मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय क्र एससीटी- ६५१०/(२२२/१०)/तांशि-७,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :- २१ जानेवारी ,२०१२**

संदर्भ :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.१५(२)(२००)/९०७२/सात-अ, दिनांक ०६/०९/२०१० चे पत्र.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत खालील उमेदवाराची अधिव्याख्याता, मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स , शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकान्यात ते ज्या दिनांकापासून त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकृत करतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गुणवत्ता क्रमांक | आयोगपुरस्कृत उमेदवाराचे नाव | वर्गवारी | आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | ०५ | श्रीमती भारती रामचंद्र कोळी | अ.ज. | अ.ज. | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथे कंत्राटी अधिव्याख्यात्याच्या सेवा समाप्त करुन रिक्त होणाऱ्या पदावर. | जातवैधता पडताळणी प्रमाणपत्राच्या अधिन राहून |

२. उपरोक्त उमेदवारास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार त्यांचा जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर त्यानी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जा पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील, त्यांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोचपावतीची सांक्षांकित प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्यास सादर करावी. सदर उमेदवाराचे जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील आणि त्या उमेदवाराविरुध्द नियुक्ती प्राधिकाऱ्यांने महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व

विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यात येईल.

३. उपरोक्त उमेदवाराला वैद्यकीय मंडळाने वैद्यकीयदृष्टया शासकीय सेवेत पात्र ठरविले आहे. तशी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी.

४. उपरोक्त उमेदवाराचा साक्षांकन नमुना पोलीसांकडून शासनास प्राप्त झालेला आहे. त्यानुसार चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीचा अहवाल समाधान कारक आहे.

५. उपरोक्त उमेदवाराची अधिव्याख्याता, मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-

१) उपरोक्त उमेदवारांची वेतनश्रेणी रु १५६००-३९१०० या पे बँड व उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय, क्र. एसपीसी-२०१०/ (३४/१०) /तांशि-२, दिनांक २०/०८/२०१० मध्ये नमूद एजीपी मध्ये राहील.

२) सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

३) उपरोक्त उमेदवारांना प्रथम वेतनवाढ परिवीक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिवीक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

४) उपरोक्त उमेदवारांचे परिवीक्षा कालावधीतील काम किवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाचे अथवा अनुरुप असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यास अथवा सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.७/८/२००० अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र **नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत** उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

६) उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

७) उपरोक्त उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन) नियम १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात यावे.

८) उपरोक्त उमेदवारांने त्यांच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून **एक महिन्याच्या आत** तात्काळ रुजु व्हावे. सदर विहीत मुदतीत जर त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही तर आयोगाने घेतलेल्या परीक्षेत त्यांनी मिळविलेल्या गुणवत्ताक्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली ज्येष्ठता मिळणार नाही. शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही

कळविले नाही तर त्यांचे नांव, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

०९) उपरोक्त उमेदवारांना वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये निर्धारित केलेली नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागू ठरेल.

१०) उपरोक्त उमेदवारांचे प्रचलित नियमानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ राहील.

११) उपरोक्त उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.

१२) उपरोक्त उमेदवारांनी नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

६. हे आदेश प्राप्त होताच संबधीत उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबंधीत संस्थाप्रमुखांकडे सादर करावा. संस्थाप्रमुखांनी याबाबतचा अहवाल संचालकांमार्फत शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( सु. हे. पाटणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
श्रीमती. भारती रामचंद्र कोळी, १८/बी, कल्याणी नगर, दादावाडी जवळ, निमखेडारोड, जळगांव,
जि. जळगांव - ४२५००२

प्रत,
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्राव्दारे)
संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
संबधीत संस्थाप्रमुख (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत) (वरील उमेदवाराच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी व जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी अहवाल तपासणी संस्थाप्रमुखांनी स्वतः करावी व सदर उमेदवारांना हजर करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल प्र. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखाधिकारी, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)१/२,मुंबई/नागपूर.
संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
निवड नस्ती.